... of H. P. & T.
NAGPUR.
344
11 FEB 1998
Desk No.........
INWARD No........

उभारणीखालील सहकारी सूत गिरण्यांच्या संदर्भात मार्गदर्शक सूचना देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक-सूतगि-११९७/प्र.क्र.३०५/टेक्स-१,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३१ जानेवारी, १९९८.

प्रस्तावना :

आठव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत उभारणीसाठी ६० सहकारी सूत गिरण्यांना शासनाने अर्थसहाय्यासाठी अंतिम मान्यता दिलेली आहे. सहकारी सूत गिरण्यांच्या प्रकल्प खर्चाचा विचार करता शासनाला रु.११२०.०० कोटीची गुंतवणूक करावी लागणार आहे. सहकारी सूत गिरण्यांच्या बाबतीत तो "उद्योग" मानून त्यांची परिणामकारकरित्या उभारणी होणे अत्यावश्यक आहे.

सहकारी सूत गिरण्यांच्या उभारणीबाबत शासनाचा पूर्वानुभव असा आहे की, ब-याच गिरण्यांच्या व्यवस्थापनेमध्ये आर्थिक शिस्तीचा अभाव व काही वेळा अनुत्पादक बाबींवर खर्च करण्याची प्रवृत्ती दिसून येते. या बाबींना आळा घालण्याच्या दृष्टीने सहकारी सूत गिरण्यांच्या उभारणीबाबत काही मार्गदर्शक सूचना देण्यासंबंधीचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन परिपत्रक :

आठव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत अर्थसहाय्यासाठी अंतिम मान्यता दिलेल्या सहकारी सूत गिरण्यांच्या उभारणीसाठी सूत गिरण्यांनी आर्थिक शिस्तीचा अवलंब करून सूत गिरणीत "उद्योग" मानून सूत गिरण्यांची परिणामकारकरित्या उभारणी व्हावी यासाठी शासन पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करीत आहे :-

[१] सूत गिरणीसाठी जागेची निवड :-

सूतगिरणीची नोंदणी झाल्यावर सूतगिरणीसाठी प्रादेशिक उपसंचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांचे अध्यक्षतेखाली [संचालक, हातमाग यांचे कार्यालयातील] कार्यकारी अभियंता, स्पिनिंग मिल फेडरेशनचे प्रतिनिधी व सूतगिरणीचे अध्यक्ष यांचा समावेश असलेल्या जागा निवड समितीने सूतगिरणीच्या जागेची निवड करावयाची आहे. सूतगिरणीसाठी योग्य जागा निवड करण्याच्या दृष्टीने ज्या ठिकाणी पाण्याचा पुरेसा साठा आहे, जमीन सपाटीकरणाची आवश्यकता नाही, विद्युत पुरवठा उपलब्ध आहे व पोच रस्ता आहे अशा योग्य तीन जागा प्रस्तावित करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे योग्य तीन जागा प्रस्तावित केल्यास सर्वात सोईची जागा निवड करणे, जागा निवड समितीस सुलभ होते. समितीने निवडलेल्या जागेस जोपर्यंत शासनाची मान्यता मिळत

...२/-

नाही तोपर्यंत संस्थेने जमिन खरेदी करू नये. जमिनीचा दर शासनाच्या नगर विकास विभागाने किंवा जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित केलेला असावा.

[२] प्रकल्पखर्च अहवाल :-

मंजूर अंदाजपत्रकानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी राज्य स्पिनिंग मिल फेडरेशनकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

राज्य स्पिनिंग मिल फेडरेशनने तयार केलेला प्रकल्प अहवाल संचालक मंडळ सभेमध्ये चर्चेला घेऊन संचालक मंडळाने मान्यता दिलेला प्रकल्प अहवाल संचालक, हातमाग यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांचे मार्फत शासनाकडे सादर करावा.

प्रकल्प अहवालात मान्य केलेल्या क्षमतेपेक्षा कमी क्षमतेची सूतगिरणी उभारणे किंवा प्रकल्प अहवालात मान्य केलेल्या गिरणीच्या प्रकल्पामध्ये बदल करण्यासाठी संचालकांच्या पूर्व परवानगीची आवश्यकता आहे.

संचालक, अशा प्रकारचा बदल सूतगिरणी आर्थिक दृष्टया फायदेशिर होऊ शकत असेल तरच मान्य करतील.

[३] वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक :-

जागेची निवड झाल्यावर संस्थेने संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांचे पॅनेल वरील वास्तुशास्त्रज्ञापैकी वास्तुशास्त्रज्ञाची निवड करणे आवश्यक आहे.

वास्तुशास्त्रज्ञाची निवड करताना पॅनेलवरील वास्तुशास्त्रज्ञांकडून स्पर्धात्मक दर मागवावेत. प्राप्त दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन कमीत कमी दराची निविदा देणा-या वास्तुशास्त्रज्ञाची शिफारस संस्थेने संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांच्याकडे करणे आवश्यक आहे.

जागेच्या निवडीपूर्वी वास्तुशास्त्रज्ञांची नियुक्ती झाल्यास वास्तुशास्त्रज्ञाचे अभिप्रायानुसार सूत गिरणीस जागा निवड करणे सुलभ होवू शकते.

वास्तुशास्त्रज्ञांची नियुक्ती करतांना संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग वास्तुशास्त्रज्ञास जेवढी फी मान्य करेल व जेवढया सवलती मान्य करेल त्या व्यतिरिक्त कोणत्याच प्रकारचे जास्त अनुदान व्यवस्थापकाने देवू नये.

वास्तुशास्त्रज्ञास संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांनी मान्यता दिलेल्या फी व्यतिरिक्त साईटवर येण्याजाण्याचा कोणताही भत्ता, प्रवास खर्च, हॉटेलमध्ये राहण्याचा खर्च, पॉकिट खर्च अशा प्रकारचा कोणताही खर्च देवू नये.

वास्तुशास्त्रज्ञाच्या फी मध्ये आर.सी.सी. कन्सलटंट फी चा समावेश आहे. आर.सी.सी.कन्सलटंट संस्थेस स्वतंत्रपणे नेमता येणार नाही, किंवा आर.सी.सी. कन्सलटंटला संस्था स्वतंत्र पणे फी देऊ शकणार नाही.

[४] सिव्हील बांधकामाचे अंदाजपत्र -

सूतगिरणीच्या जागेत शासनाची मान्यता मिळाल्यावर वास्तुशास्त्रज्ञाकडून प्रस्तावित गिरणीच्या वास्तुचा आराखडा तयार करून त्या आराखड्यानुसार सिव्हील बांधकामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करावे. अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या त्या विभागातील डी.एस.आर.नुसार असणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकास संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकात संचालकांच्या मान्यतेशिवाय बांधकामास सुरुवात करणे योग्य नाही.

[५] कंत्राटदाराची नियुक्ती -

बांधकामाचे अंदाजपत्रक मंजूर झाल्यावर बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पंजीबध्द कंत्राटदाराकडून जाहिरातीद्वारे निविदा मागवाव्यात.

प्राप्त निविदा दराच्या तुलनात्मक तक्ता व गिरणीवरील संचालक मंडळाच्या ठरावासह कंत्राटदार नेमणूकीचा प्रस्ताव संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांच्याकडे सादर करावा व त्यांच्या मंजूरीनंतरच कंत्राटदाराला "वर्क ऑर्डर" द्यावी. कंत्राटदाराच्या नियुक्तीस मान्यता मिळाल्यावर प्रथम त्याचेशी करार करावा व करार केल्यावर कामास सुरुवात करावी.

बांधकाम पूर्ण झाल्यावर कंत्राटदारास अंतिम पेमेंट करण्यापूर्वी त्यांनी मंजूर आराखड्यानुसार बांधकाम पूर्ण केल्याचे कमीशन सर्टीफिकेट त्याचेकडून घ्यावे गिरणीचे वास्तुशास्त्रज्ञ व संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांच्या अधिनस्त असलेले कार्यकारी अभियंता यांची त्यावर प्रतिस्वाक्षरी असावी.

[६] वित्तीय संस्थाकडून घ्यावयाच्या कर्जाची व्यवस्था -

प्रकल्प खर्चाच्या ५० प्रतिशत रक्कम वित्तीय संस्थाकडून कर्ज घेऊन उभारावयाची आहे. साधारणतः आय.डी.बी.आय. व आय.एफ.सी.आय., एन.सी.डी.सी. किंवा महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बॅन्क सूत गिरणीच्या उभारणीसाठी कर्ज मंजूर करते. सदरच्या कर्जासाठी संबंधित संस्थेशी संपर्क साधून त्या संस्थेकडून कर्जाची हमी मिळविणे आवश्यक आहे. उभारणी खालील काही सूत गिरण्यांनी बॅन्केकडून कर्ज घेऊन स्वत:कडे ठेवलेले आहे. परिणामत: व्याजापोटी सूतगिरणी उत्पादनात येण्यापूर्वीच संबंधित सूतगिरणीस लक्षावधी रुपये खर्च करावे लागत आहेत. शासनाकडून पुरेसे भागभांडवल प्राप्त झाल्याशिवाय वित्तीय संस्थाकडून कर्ज घेणे उभारणीखालील सहकारी सूत गिरण्यांच्या हिताचे नाही. शासनाकडून पुरेसे भागभांडवल प्राप्त झाल्याशिवाय वित्तीय संस्थेकडून व्याजाचे

[७] यंत्रसामुग्रीची खरेदी -

यंत्रसामुग्रीची निवड करताना संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या मॉनिटरींग कमिटीच्या सल्ल्याने यंत्रसामुग्रीची निवड करावी. यंत्रसामुग्रीचा दर स्पर्धात्मक असावा.

यंत्रसामुग्रीच्या बुकींगसाठी यंत्रसामुग्रीच्या रकमेचा शेकडा १० पेक्षा जास्त रक्कम अग्रीम म्हणून देऊ नये. उर्वरित रक्कम यंत्रसामुग्रीचा पुरवठा झाल्यावर अदा करावी.

यंत्र ..सामुग्रीच्या किंमतीत पुरवठ्याच्या वेळी वाढ झाली असल्यास वाढीच्या किंमतस मॉनिटरींग कमिटीची पूर्व मंजूरी घ्यावी.

यंत्र सामुग्रीचा पुरवठा करताना कंपनीशी संचालक, हातमाग, यंत्रमाग वस्त्रोद्योग यांनी दिलेल्या **मार्गदर्शक** सूचना नुसार विस्तर करारनामा करा.. करारामध्ये यंत्रसामुग्री पुरवठ्याचा कालावधी व यंत्रसामुग्री बसविल्यानंतर योग्य प्रकारे चालण्याबाबत हमी कालावधी स्पष्टपणे नमुद करावा. यंत्रसामुग्री पुरवठा **"टर्म फी"** बैसीसवर करण्याची तरतूद करारात असावी.

यंत्रसामुग्री पुरवठा दरास मंजूर किंमती व्यतिरिक्त यंत्रसामुग्री बसविण्यासाठी खर्च किंवा सर्व्हीस इंजिनियरचा दैनिक भत्ता, प्रवास खर्च इत्यादि प्रकारचे अनावश्यक खर्च देण्यास मान्यता देऊ नये.

स्पेअर पार्टस खरेदीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागवाव्यात प्राप्त निविदेचा अभ्यास करून उप समितीने मंजूरी दिल्यावरच खरेदी करावी. उप **समिती** किमान ९ सदस्यांची असावी. उप समितीमध्ये प्रादेशिक उप संचालक यांचा समावेश असावा.

[८] सदस्यांचा भागभांडवलातून अनुज्ञेय खर्च -

**सभासदां**कडून गोळा केलेल्या भागभांडवलाची रक्कम, मंजूर केलेले कार्यालयीन भाडे, व कार्यालयीन खर्च इ.साठी खर्च करावा. खर्चास संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांची पूर्व परवानगी घ्यावी. संचालकांच्या मान्यतेशिवाय रक्कम बॅन्केच्या खात्यातून काढू नये.

[९] शासकीय भागभांडवलातून अनुज्ञेय खर्च-

शासनाने मंजूर केलेले भागभांडवल संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग व सूत गिरणीचे अध्यक्ष यांचे संयुक्त खाते संचालकांनी परवानगी दिलेल्या बॅन्केत खाते उघडून गुंतवणूक करावी.

भागभांडवलाच्या विनियोग केवळ प्रकल्प उभारणीच्या कामासाठी करावा. खर्चास संचालकांची पूर्व परवानगी घ्यावी. आवर्ती खर्च जसे कर्मचारी वेतन, कार्यालयीन .....५/-

भाडे, विद्युत बील, व्यवस्थापनाचे प्रवास भत्ते, इ. खर्च शासकीय भागभांडवलातून करता येणार नाही. फक्त बांधकाम व यंत्रसामुग्री खरेदी यासाठीच शासकीय भागभांडवलाच्या रकमेचा खर्च करावा.

गोठविलेल्या खात्यातून किंवा संयुक्त खात्यातून काढलेल्या रकमेचा जमाखर्च नियमित रेकॉर्ड बुकमध्ये नोंदवून तपासणीच्या वेळी उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी. खर्चाबाबतची माहिती प्रत्येक महिन्यात संचालकांस सादर करावी.

(१०) बांधकामावर नियंत्रणासाठी सिव्हील इंजिनियरची नियुक्ती -

बांधकामावर दैनंदिन लक्ष ठेवण्यासाठी एका सिव्हील इंजिनियरची नियुक्ती करता येईल. परंतु त्याचे एकत्रित वेतन रु. ५०००/- पेक्षा जास्त असु नये. नियुक्तीस संचालक वस्त्रोद्योग यांची पूर्व परवानगी असणे आवश्यक आहे.

सिव्हील इंजिनियरची नियुक्ती केल्यास ती जास्तीत जास्त एका वेळी तीन महिन्यासाठी असावी. वेतनाचा उल्लेख नियुक्ती पत्रामध्ये मासिक न करता एकत्रितपणे पूर्ण नियुक्ती कालासाठी करावा.

(११) बँकेत खाते उघडण्याबाबत -

संस्थेने एक मुदत ठेवीचे खाते व एक सेव्हींग खाते यापेक्षा अन्य प्रकारची खाती एकापेक्षा जास्त बँन्केमध्ये उघडू नये. संयुक्त खात्यामध्ये गुंतविलेली रक्कम मुदत ठेवींमध्ये सुध्दा गुंतविता येईल परंतु मुदत ठेवीवर कर्ज उभारणी करुन परस्पर करता येणार नाही. रु.१०००/- पेक्षा जास्त रकमेचे व्यवहार रोखीने न करता धनादेशाद्वारे करावे.

(१२) गिरणी चालविण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती. -

प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात करण्यापूर्वी सूत गिरणीस राज्य फेडरेशनने निर्धारित केलेल्या आकृतीबंधानुसार कर्मचारी नियुक्ती करावी. कामगारांची नियुक्ती विटा नॉर्म्स नुसारच करावी. सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी नियुक्तीसाठी संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

(१३) प्रोजेक्ट कन्सलटंटस अर्थ व वित्त सल्लागार -

प्रोजेक्ट कन्सलटंटस अर्थ व वित्त सल्लागार कर्ज मंजुरीसाठी चार्टर्ड अकाउन्टन्ट ( सी.ए. ) अशा सारख्या अनावश्यक नियुक्त्या सूतगिरणीने करु नयेत.

(कृ.मा.प.)

Desk No.

INWARD

(१४) खालील बाबींवरील खर्च टाळावा. -

संचालक मंडळातील सदस्य किंवा अन्य प्रतिष्ठीतांना भेट वस्तू देणे, संचालक मंडळ सदस्यांनी परदेशात किंवा परप्रांतामध्ये जाणे या बाबी प्रकर्षाने व कटाक्षाने टाळाव्यात. उद्घाटन समारंभाच्या निमित्ताने अनावश्यक खर्च टाळावा. प्रचार व प्रसार सारख्या बाबींवर खर्च करता येणार नाही.

वर नमूद केलेल्या सूचनांचे / निर्देशनांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित सूत गिरणीस शासकीय भागभांडवलाचा पुढील हप्ता मंजूर केला जाणार नाही किंवा मंजूर केलेल्या रकमेची वसुली करण्याची कार्यवाही केली जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ज. कि. मगरे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग.

प्रत,

संचालक हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग , नागपूर.
प्रादेशिक उप संचालक, नागपूर/मुंबई/पुणे/औरंगाबाद.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट को.-ऑप., स्पिनिंग मिल्स फेडरेशन, वकील हाउस, मुंबई.
संबंधित ६० सहकारी सूत गिरण्या.
निवड नस्ती.

नि३/२९/४